यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन शिवार, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२

जावक क्र: HX/Stay home-1 दिनांक 8 मे 2020.

शै. वर्ष 2019-20 – अभ्यासकेंद्र संयोजकांनी घरात राहून घरच्या संगणकावर करावयाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत महत्वाचे सूचनापत्र

1) **शै.वर्ष 2019-20 मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमासाठी ऑनलाईन प्रवेशअर्ज भरला आहे तसेच ऑनलाईन प्रवेश शुल्क भरले आहे परंतु अभ्यासकेंद्र मान्यता प्रक्रिया (Study Center Approval Process) प्रलंबित असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अभ्यासकेंद्रांनी घरात राहून करावयाची कार्यवाही :**

- Study Center Approval Link (अभ्यासकेंद्र मान्यता लिंक) दिनांक 8 मे 2020 पासून सुरु करण्यात येत आहे. सदर लिंक लॉकडाऊन कालावधी संपल्यानंतर पुढे सात दिवस सुरु राहील.
- ज्या अभ्यासकेंद्रांना त्यांच्या स्वत:कडे असणाऱ्या कागदपत्रांच्या अथवा ऑनलाईन प्रवेशअर्जासोबत अपलोड केलेल्या स्कॅन कॉपीजच्या आधारे घरच्या संगणकावरून अभ्यासकेंद्र मान्यता देणे शक्य आहे अशा अभ्यासकेंद्रांनी विद्यार्थ्याच्या अनुपस्थितीत अभ्यासकेंद्र मान्यता प्रक्रिया सुरु करावी.

अत्यंत महत्वाची टीप : **लॉकडाऊन कालावधीच्या दरम्यान कोणत्याही विद्यार्थ्यास या प्रक्रियेसाठी प्रत्यक्ष बोलावू नये. COVID-19 च्या अनुषंगाने कोणत्याही शासकीय नियमांचा भंग होवू नये अशा पद्धतीने विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीत अभ्यासकेंद्र मान्यतेची प्रक्रिया पार पाडण्यात यावी.**

संचालक
विद्यार्थी सेवा विभाग